# सुधीर मुनगंटीवार

**माजी मंत्री**

**विधानसभा सदस्य, महाराष्ट्र**


सत्यमेव जयते

वंदे मातरम् १५०

वंदे मंत्राहुन आम्हा वंद्य वंदे मातरम्

जा.क्र.1157 जुलै/२०२६ ०९/०७/२०२३

प्रति,

मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस
मुख्यमंत्री,
महाराष्ट्र राज्य.

सचिव कृषी
अत्यंत गंभीर विषय आहे
तातडीने तपासून सविस्तर रिपोर्ट
सादर करावा
[illegible]

वंदे मातरम् !

**विषय : खरीप हंगाम 2026 साठी चंद्रपूर जिल्ह्यातील भात, सोयाबीन व कापूस पिकांसाठी निश्चित करण्यात आलेला अवाजवी पीक विमा हप्ता कमी करून शेजारील जिल्ह्यांप्रमाणे वाजवी दर लागू करण्याबाबत.**

**संदर्भ** : शासन निर्णय क्रमांक बैठक-2026/प्र.क्र.122/का.11ए/ई-16670093, दिनांक 03 जुलै 2026

**महोदय,**

शासनाने संदर्भाधीन शासन निर्णयानुसार खरीप हंगाम 2026 साठी प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत विविध जिल्ह्यांतील पिकांसाठी विमा हप्ते निश्चित केले आहेत. मात्र, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी निश्चित करण्यात आलेला विमा हप्ता हा विदर्भातील शेजारील जिल्ह्यांच्या तुलनेत अत्यंत जास्त असून त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. चंद्रपूर जिल्ह्याच्या लगत असलेले गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर व वर्धा हे सर्व जिल्हे भौगोलिक परिस्थिती, हवामान, पर्जन्यमान, मृदेचा प्रकार, पीक पद्धती तसेच नैसर्गिक आपत्तीच्या दृष्टीने बहुतांश प्रमाणात चंद्रपूर जिल्ह्यासारखीच परिस्थिती असलेले आहेत. या सर्व जिल्ह्यांमध्ये भात, सोयाबीन व कापूस ही प्रमुख पिके घेतली जातात. तसेच अतिवृष्टी, अवकाळी पाऊस, पूर, कीड-रोगांचा प्रादुर्भाव आणि नैसर्गिक संकटांचाही सामना जवळपास समान स्वरूपात करावा लागतो. चंद्रपूर जिल्ह्यात पीक विम्याची गरज इतर जिल्ह्यांच्या तुलनेत अधिक आहे. असे असताना, शेजारील जिल्ह्यांमध्ये अत्यल्प विमा हप्ता आकारण्यात येत असताना केवळ चंद्रपूर जिल्ह्यातच अनेक पटीने अधिक विमा हप्ता निश्चित करण्यात आला आहे.


पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत

दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३१०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४

+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com

@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com

# सुधीर मुनगंटीवार
माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र


वंदे मातरम् १५०
वंदे मंत्राहुन आम्हा वंद्य वंदे मातरम्

जिल्हानिहाय पीक विमा हप्ता (प्रति हेक्टर) :

| अ.क्र | जिल्हा | पिकाचे नाव | विमा हफ्ता (शेतकरी) |
|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | भात | ५१२ |
| २ | गडचिरोली | कापूस | ५९० |
| ३ | गोंदिया | भात | ६० |
| ४ | भंडारा | भात | ५७५ |
| ५ | नागपूर | भात | ६५ |
| ६ | नागपूर | कापूस | ६५ |
| ७ | वर्धा | सोयाबीन | ६५ |
| ८ | वर्धा | कापूस | ६५ |
| ९ | चंद्रपूर | भात | १३०० |
| १० | चंद्रपूर | सोयाबीन | १२५० |
| १० | चंद्रपूर | कापूस | १३०० |

वरील तुलनेवरून स्पष्ट होते की, समान भौगोलिक व कृषी परिस्थिती असलेल्या जिल्ह्यांच्या तुलनेत चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर अनेक पटीने अधिक आर्थिक भार टाकण्यात आला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संभ्रम व नाराजी आहे.

सध्या खरीप हंगाम सुरू असून शेतकऱ्यांनी बियाणे, खते, कीडनाशके, मजुरी, मशागत, सिंचन आदीवर मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. त्यातच एवढा मोठा पीक विमा हप्ता भरावा लागत असल्याने अनेक शेतकरी पीक विमा काढण्यापासून वंचित राहण्याची शक्यता आहे. भविष्यात नैसर्गिक आपत्ती, अतिवृष्टी, पूर, दुष्काळ, कीड-रोग किंवा वन्यप्राण्यांमुळे नुकसान झाल्यास या शेतकऱ्यांना आर्थिक संरक्षण मिळणार नाही. त्यामुळे प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा मूळ उद्देशच बाधित होईल.

- चंद्रपूर जिल्ह्यातील भात, सोयाबीन व कापूस पिकांसाठी निश्चित करण्यात आलेल्या विमा हप्त्याचा तातडीने फेरविचार करण्यात यावा.
- चंद्रपूर जिल्ह्याच्या लगत असलेल्या गडचिरोली, गोंदिया, भंडारा, नागपूर व वर्धा जिल्ह्यांप्रमाणे चंद्रपूर जिल्ह्यातही वाजवी व परवडणारा पीक विमा हप्ता निश्चित करण्यात यावा.
- राज्य शासन, कृषी विभाग व संबंधित विमा कंपनीची तातडीने बैठक घेऊन दरामधील विसंगती दूर करण्यात यावी.


पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com

# सुधीर मुनगंटीवार
माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र


वंदे मातरम् १५०
वेद मंत्राहून आम्हा वंद्य वंदे मातरम्

➢ सुधारित विमा हप्ता निश्चित होईपर्यंत पीक विमा भरण्याची अंतिम मुदत वाढविण्यात यावी, जेणेकरून कोणताही शेतकरी विमा योजनेपासून वंचित राहणार नाही.

त्याअनुषंगाने खरीप हंगाम 2026 साठी चंद्रपूर जिल्ह्यातील भात, सोयाबीन व कापूस पिकांसाठी निश्चित करण्यात आलेला अवाजवी पीक विमा हप्ता कमी करून शेजारील जिल्ह्यांप्रमाणे वाजवी दर लागू करण्याबाबत संबंधितांना आदेश प्रदान करावे, ही विनंती.

कार्यवाहीची रुपरेषा मला कळविल्यास मी आपला आभारी राहील.

धन्यवाद !

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

**प्रत :**

१) मा. जिल्हा कृषी अधिक्षक, चंद्रपूर
२) श्री. बंडू गौरकार,
सदस्य, कृषी मुल्य आयोग, महाराष्ट्र राज्य, मुंबई मो.क्र. ९१४५४०५६६७


पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर–४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com